**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास निवृत्ती पाटील
स.नं.२३/१०, बालाजीनगर, धनकवडी, हेरंब अपार्टमेंटशेजारी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ कार्यालय,
कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षण मंडळ कार्यालय,
कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१९ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास निवृत्ती पाटील
स.नं.२३/१०, बालाजीनगर, धनकवडी, हेरंब अपार्टमेंटशेजारी, पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ कार्यालय,
कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.सुधाकर तांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१०.२००७, दि.१.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.११.२००७, दि.१.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००८, दि.११.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१.२००८, दि.२२.१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००३ मधील शिक्षण मंडळाकडील भरती प्रक्रियेवर चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती नेमली होती, त्याच्या चौकशी अहवालाची प्रत, नसेल तर त्याची कारणे लेखी स्वरुपात. त्यानंतर आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त यांची एकसदस्यीय चौकशी समिती नेमली होती, त्याचा प्रत्यक्ष पाहणी व चौकशी अहवाल, अडताणी समितीने नियम डावलून भरती झाल्याचे स्पष्ट केले त्याप्रमाणे हा अहवाल स्थायी समितीसमोर चर्चेस येणार होता. त्यासंदर्भातील सर्व तपशील. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाकडील सन २००३ मधील भरती प्रक्रियेबाबत नेमलेल्या दोन चौकशी समित्यांचे अहवाल अवलोकनार्थ व त्यांची प्रत मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.रामदास निवृत्ती पाटील यांनी केली होती. संबंधित प्रकरण पुणे महानगरपालिकेकडे चौकशीसाठी असल्याचे तत्कालीन शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ कार्यालय, कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, पुणे श्री.अशोक राजगुरु यांनी श्री.पाटील यांना कळविले. प्रथम अपिलावरही शिक्षणप्रमुखांनीच तसाच निर्णय कळविला. त्याविरुध्द श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री.एस.बी.पाटील, सहआयुक्त श्री.कळमकर व लेखापाल श्री.गालिंदे यांची त्रिसदस्य समिती महानगरपालिका आयुक्तांनी सन २००३ साली नेमली. त्यानंतर याच प्रकरणी अतिरिक्त आयुक्त श्री.मोहन अडताणी यांची चौकशी समिती आयुक्तांनी नेमली. चौकशी पूर्ण होऊन अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यातील निष्कर्षांच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द झाल्या आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीत व सर्वसाधारण सभेत हा अहवाल मांडण्यातही आला. तरीही चौकशी चालू असल्याचे उत्तर देऊन आपल्याला त्याची प्रत

दिली जात नाही, यामागे माहिती लपवून ठेवण्याची प्रवृत्तीच दिसून येते, असे प्रतिपादन श्री.पाटील यांनी केले.

शिक्षण मंडळ व महानगरपालिका यांचा कारभार वेगवेगळा आहे. महानगरपालिकेच्या स्तरावर चौकशी होऊन अहवाल तयार झाला असला तरी अजून तो शिक्षण मंडळाला प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त करुन घेऊन देण्यात येईल, असे निवेदन विद्यमान शिक्षणप्रमुख श्री.सुधाकर तांबे यांनी केले. श्री.तांबे यांचे हे निवेदन खरे असल्यास मूळ विषयाला पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतरही शिक्षण मंडळाला संबंधित अहवालाची प्रत दिली नाही, असा अर्थ होतो. शिक्षण मंडळाला अहवाल केव्हा प्राप्त झाला व त्याची प्रत अपीलकर्त्याला का दिली नाही, याबाबतचा खुलासा श्री.तांबे यांनी तीन दिवसांत आयोगाला सादर करावा, तसेच अपीलकर्त्याला अहवालांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. मात्र श्री.तांबे यांनी त्यानुसार कार्यवाही केली नाही. संपूर्ण माहिती दिल्यानंतर चौकशी अहवालाची प्रत श्री.पाटील यांना दि.१८.८.२००८ रोजी दिल्याचा अहवाल श्री.तांबे यांनी आयोगाने विचारणा केल्यानंतर दि.१२.५.२००९ रोजी आयोगाला सादर केला, मात्र श्री.एस.बी.पाटील, श्री.कळमकर व श्री.गालिंदे या त्रिसदस्य समितीच्या चौकशी अहवालाची प्रत मिळाली नसल्याचे श्री.पाटील यांनी त्यांच्या उत्तराची पोच देताना दि.१८.८.२००८ रोजी नमूद केले आहे. शिक्षण मंडळाला अहवाल कधी प्राप्त झाला व अपीलकर्त्याला तो का दिला गेला नाही, याबाबतचा कोणताही खुलासा श्री.तांबे यांनी केलेला नाही. त्यामुळे याबाबतची संदिग्धता कायम राहिल्यामुळे आयोगाने श्री.तांबे यांच्याकडे पुन्हा खुलाशाची मागणी केली. त्यावर श्री.तांबे यांनी दि.२०.५.२००९ रोजी खुलासा सादर केला. 'महानगरपालिका आयुक्त कार्यालयाकडून सदरची फाईल इकडील कार्यालयाकडे उपलब्ध करुन श्री.पाटील यांना समक्ष बोलावून देण्यात आली,' असे श्री.तांबे यांनी त्यात नमूद केले आहे.

याच अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण अधिकारी श्री.धनंजय परदेशी व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणप्रमुख श्री.अशोक राजगुरु यांचा खुलासा आयोगाने दि.१२.६.२००९ च्या पत्रान्वये मागविला. आपल्या कार्यकालावधीमध्ये

महानगरपालिका, पुणे स्तरावर शिक्षण मंडळातील कर्मचारी/अधिकारी भरतीच्या संदर्भात गोपनीय स्वरुपात चौकशी सुरु होती. त्यामुळे माहिती देण्यासाठी आवश्यक असलेल्या नस्ती तत्कालीन अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी त्यांचे कस्टडीमध्ये जमा केल्या होत्या. महानगरपालिका स्तरावरील चौकशीचा कालावधी प्रलंबित होत गेला. त्यामुळे त्यावेळी त्यातील माहिती देता आली नाही,' असे श्री.परदेशी व श्री.राजगुरु यांनी अनुक्रमे दि.२२.६.२००९ व दि.२०.६.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या खुलाशात नमूद केले आहे. तसेच, आपल्याला माहिती मिळाली असून कोणतीही तक्रार नाही, असे अपीलकर्ता श्री.पाटील यांचे लेखी निवेदन श्री.राजगुरु यांनी सोबत जोडले आहे.

वरील बाबी लक्षात घेता महानगरपालिका आयुक्तांकडील अहवाल शिक्षण मंडळ कार्यालयाकडे प्राप्त करुन देण्याबाबत/घेण्याबाबत कोणीच तत्परता दर्शविलेली नाही, हे दिसते. ही अवस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अपेक्षित असलेल्या पारदर्शकतेच्या तत्त्वाला मारक आहे, हे लक्षात घेऊन कार्यपध्दतीत आवश्यक ती सुधारणा करण्याची समज शिक्षणमंडळाच्या व महानगरपालिका आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. अरुण सोनबा जगताप
'दर्शननगरी', बी.नं.अे-८/३,
काळेवाडी, चिंचवड पुलाजवळ,
केशवनगर, चिंचवडगाव, पुणे-१३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक आयुक्त (प्रशासन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** --<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे श्री.सुधाकर विष्णू देशमुख<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहायक आयुक्त (प्रशासन),<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे श्री. बाबु गेनू पवार | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०३.०१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०६.०२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.०३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन २००६ ते २००८ या कालावधीतील प्रशासन अधिकारी पदोन्नती संदर्भातील कागदपत्रे | |

<u>**विवेचन**</u>

अपीलकर्ता श्री.अरुण सोनबा जगताप यांनी सन २००६ ते २००८ या कालावधीतील प्रशासन अधिकारी या पदाच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने सर्वश्री वाळके, पवार, भोसले, कांदळकर, निकम व श्रीमती दुरगडे यांच्या वेतननिश्चितीचे आदेश, वेतनचिठ्ठी, पदोन्नती कायम केल्याचे आदेश व पदोन्नती निवड समितीचे सभावृत्त याची मागणी केली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील केले आहे.

माहिती तयार असूनही श्री.जगताप घेऊन गेले नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या लेखी व तोंडी निवेदनावरुन स्पष्ट होते.

श्री. अरुण सोनबा जगताप यांचे दि.२५.०१.२००९ रोजी निधन झाले असल्याचे अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त (प्रशासन), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पिंपरी, पुणे यांनी त्यांचा मृत्यू दाखल्याच्या प्रतीसह अहवालात नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : १८ / ०९/२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. भालचंद्र शंकरराव पाठक
१८४१, महेंद्रनगर, मु.पो.व ता. करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६. २००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री. एम. एम. वीर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री. एस. के. सगरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि १२.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ----- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.----- |
| | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>माध्यमिक शाळांमधून कार्यरत असणा-या डी. एड. शिक्षकांना निवडश्रेणी देण्याबाबतचा शासन निर्णय, जिल्हयात डी. एड. शिक्षकांना निवडश्रेणी दिलेल्याची संख्या, सध्या जिल्हयात निवडश्रेणी घेणा-या ५ - ६ शिक्षकांची नावे, पत्ता व विद्यालयाचे नाव. | |

## विवेचन

माध्यमिक शाळांमधून कार्यरत असणा-या डी. एड. शिक्षकांच्या निवडश्रेणीबाबतची माहिती अपीलकर्ते श्री. भालचंद्र शंकरराव पाठक यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडे तीन अर्जांव्दारे मागितली होती. दि. १८.६.२००८ रोजीच्या ' विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्यास २० दिवसांत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्या वेळी मान्य करुनसुध्दा माहिती दिली नसल्याचे अपीलकर्त्याने आयोगास कळविल्याने सदर अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

यापूर्वी दोन वेळा विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे. मूळ प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने निवडश्रेणीबाबतच्या त्रुटी शाळेला कळवून प्रस्तावाला मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सोलापूर श्री. एस. के. सगरे यांनी केले. त्यानुसार कार्यवाही केल्याचा अहवाल पाठविण्याचा मौखिक आदेश जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यांना आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार सर्व परिपूर्ण माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे निवेदन अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांना दि. १.७.२००९ रोजी दिले असून या निवेदनाची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. १०.७.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**

**दि.२२,०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲन्ड कन्सल्टीज, हिरामण लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, उत्तर प्रभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४५ / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.८.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲन्ड कन्सल्टीज, हिरामण लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, उत्तर प्रभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री.महावीर कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ प्रतिनिधी श्री.सुभाष डुंबरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.४.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>ॲड.भास्कर भागवत सुरवसे यांनी दिलेल्या नोटिशीवर आपण केलेल्या चौकशीचा तपशिलात्मक अहवाल लेखी स्वरुपात मिळावा. त्या संबंधात विविध व्यक्तींचे घेतलेले जबाब, त्याबाबत घेतलेला निर्णय इत्यादि. | |

## विवेचन

ॲड.भास्कर भागवत सुरवसे यांच्या दि.११.२.२००४ च्या नोटिशीवरील कारवाईच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती मिळाली नाही व प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही योग्य व अपूर्ण माहिती दिली, म्हणून दोषी अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी व पूर्ण माहिती मिळावी, अशा मागणीसाठी अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बावधनकर यांनी केलेले निवेदन वस्तुस्थितीशी सुसंगत नाही. त्यांच्या दोन अर्जांवर माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. तसेच अपिलाची सुनावणी घेऊन निर्णयही देण्यात आला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.महावीर कांबळे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.सुभाष डुंबरे यांनी केले. 'दि.२९.११.२००७ च्या अर्जानुसार मौजे रहाटणी, ता.हवेली येथील स.नं.३७ बाबतची माहिती दि.१.१२.२००७ रोजी देण्यात आली. दिलेल्या अभिलेखा-व्यतिरिक्त कोणताही अभिलेख हवेली कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी स्पष्ट करण्यात आले होते. दि.१०.१.२००८ च्या अर्जावर शुल्क भरण्यास कळविले होते. परंतु हे पत्र आपल्याला मिळाले नसल्याचे श्री.बावधनकर यांनी सांगितले. माहिती तयार असल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीत स्पष्ट करण्यात आले. दोन्ही अर्जांबाबत

श्री.बावधनकर यांनी मूळ अर्जात मागणी नसलेली अतिरिक्त माहिती देण्याची मागणी केली. त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती नि:शुल्क देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. श्री.बावधनकर यांनी तोंडी युक्तिवादामध्ये न्याय मिळावा यासाठी मागणी केलेली आहे. या कामी शहर अभियंता या नात्याने कार्यकारी अभियंता यांनी याबाबत चौकशी व कारवाई करणेकामी अलाहिदा कळविण्यात येईल, अशी प्रशासकीय कार्यवाहीची बाबही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाच्या निकालपत्रात नोंदविली आहे,' असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

वरील संदर्भात दिलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दि.४.९.२००८ पर्यंत अहवाल सादर करावा व माहिती द्यावयाची राहिली असल्यास अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दि.१.९.२००८ रोजी श्री.बावधनकर यांना पत्र पाठविले. 'दि.११.२.२००४ च्या ॲड.सुरवसे यांच्या नोटिशीवर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अभिलेख आढळून आले नाहीत, त्यामुळे अभिलेख निरंक असल्याची या विभागाची धारणा कायम आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीत मूळ अर्जात न मागितलेली; परंतु तोंडी युक्तिवादामध्ये आपण मागणी केलेली माहिती (२९७३ पाने) दि.४.३.२००८ रोजी आपल्या कार्यालयात समक्ष नि:शुल्क देऊन पोहोच घेतलेली आहे. या व्यतिरिक्त काही अभिलेखांची पाहणी करावयाची असल्यास ते उपलब्ध करुन दिले जातील, असे श्री.बावधनकर यांना कळविले आहे,' असा अहवाल दि.२.९.२००८ रोजी आयोगास सादर केला.

जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित अभिलेख गहाळ केले आहेत. त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी श्री.बावधनकर यांनी दि.१५.९.२००८ च्या निवेदनाद्वारे आयोगाकडे केली.

मूळ अर्जात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मूळ अर्जापलीकडे जाऊन अपीलकर्त्याने नंतर मागितलेली माहिती नि:शुल्क देण्याचा आदेश दिला. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. अभिलेख गहाळ केल्याची अपीलकर्त्याची तक्रार असल्यास त्याबाबत ते रीतसर प्रशासकीय मार्गाचा अवलंब करु शकतात. पुराव्यानिशी सिध्द केल्याशिवाय ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येणार नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीकांत प्रभाकर अग्निहोत्री
२५/४, फुलेनगर, आळंदी रोड, येरवडा, पुणे-४११००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७० / पुणे / |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीकांत प्रभाकर अग्निहोत्री
२५/४, फुलेनगर, आळंदी रोड, येरवडा, पुणे-४११००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ श्री.अ.कृ.जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ श्री.इ.मु.काझी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने दुर्बल घटकांसाठी गृहनिर्माण योजना अंतर्गत बांधलेल्या बैठ्या (तळमजल्याच्या) सदनिका मालकी हक्काने देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि.१९ मे १९८७ च्या शासन निर्णयाची प्रत, तसेच तत्संबंधी पुढील काळात व आजपावेतो शासनाने वेळोवेळी काढलेले शासन निर्णय, त्यात केलेल्या दुरुस्त्या, तसेच त्यावरील शुध्दीपत्रे. |

## विवेचन

महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने फुलेनगर-आळंदी रस्ता, येरवडा,पुणे येथे बांधलेले ३०० बैठे गाळे विक्री करुन मालकी हक्काने देण्याच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.श्रीकांत प्रभाकर अग्निहोत्री यांनी मागितली होती. आपल्याला विहित मुदतीत व योग्य माहिती मिळाली नाही, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मुंबई यांच्याकडे अर्ज केलेला असताना त्यांनी माहिती पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ, पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील असल्याचे कळवून अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. त्यांनी दिशाभूल करणारी माहिती व तीही (दि.१५.३.२००७ ते २.७.२००७) ७३ दिवस विलंबाने दिली, म्हणून आपण केलेल्या अपिलाची दखल उपसचिव, गृहनिर्माण यांनी घेतली नाही. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी अर्ज वर्ग करणे योग्य ठरवून अपील निकाली काढले, म्हणून त्याविरुध्द श्री.अग्निहोत्री यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२६.११.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

म्हाडाच्या इमारतीच्या मालकी हक्काबाबतचा मूळ शासन निर्णय व त्यातील दुरुस्त्या, शुध्दीपत्रे यांची माहिती आपण मागितली होती. शासनाच्या सन १९८७ च्या धोरणात्मक निर्णयात ३०० बैठे गाळे मालकी हक्काने 'जसे आहेत जेथे आहेत' या तत्त्वावर गाळे/सदनिका धारकांना विकत देण्याचा निर्णय झाला आहे. मात्र फुलेनगर विकास प्रतिष्ठान यांनी भाडेपट्टा कराराच्या संदर्भातील हमीपत्र सदनिका धारकांकडून लिहून घेतले. यातील विसंगती लक्षात घेता सत्य जाणून

घेण्यासाठी आपण माहिती मागितली. परंतु गृहनिर्माण मंत्रालयाच्या, तसेच पुणे गृहनिर्माण मंडळाच्या पातळीवरुन आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही. विविध पातळ्यांवर व वारंवार पत्रव्यवहार करुनही आपल्याला योग्य माहिती दिली जात नाही व सन १९९२ पासून म्हाडाने हस्तांतरणाचे कागदपत्र वेळेत दिले नसून गाळे हस्तांतरणाचे व्यवहार केलेले नाहीत. हा विलंब का झाला याची माहिती मिळालेली नाही, असे प्रतिपादन श्री.अग्निहोत्री यांनी केले.

मूळ पत्रामध्ये मु.क्र.१ व ५ मध्ये म्हाडा व शासन स्तरावर सन १९९२ मध्ये गाळा धारकांना विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला, असे चुकून नमूद केले गेले आहे. बैठे गाळे विक्रीचा निर्णय शासनाने दि.१८.५.१९८७ अन्वये झाला व त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सन १९९२ मध्ये म्हाडाने केली, असे पुणे गृहनिर्माण मंडळाचे जन माहिती अधिकारी श्री. श्री.सा.गं.घोडे यांनी लेखी व तोंडी स्पष्ट केले.

श्री.अग्निहोत्री यांनी एकच अर्ज केलेला नाही. सर्वसाधारण पत्रव्यवहार, त्यातील मुद्दयानुसार माहितीच्या अधिकारातील अर्ज, त्यातील उत्तरावरील पुरवणी अर्ज पुन:पुन्हा केले आहेत. या पत्रांना व अर्जांना वेळोवेळी उत्तरे दिलेली आहेत, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. सर्व गाळेधारकांनी हस्तांतरणासाठीची रक्कम भरली आहे, त्याबाबत कार्यवाही चालू आहे, अशी माहिती अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय श्री.अ.कृ.जगताप यांनी दिली.

आपल्याला विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्याचे व ७३ दिवस विलंब झाल्याचे श्री.अग्निहोत्री यांनी विविध निवेदनाद्वारे व सुनावणीत प्रतिपादन केले. परंतु सर्वसाधारण पत्रव्यवहार, त्याला शासकीय अधिकाऱ्यांनी दिलेली उत्तरे, माहितीच्या अधिकारातील अर्ज, त्यावरील पुरवणी मागणी अर्ज असा विपुल पत्रव्यवहार श्री.अग्निहोत्री यांनी केला आहे. त्यानुसार त्याला वेळोवेळी दिलेली उत्तरे पाहता असा विलंब सिध्द होत नाही. तसेच अनेक बाबतीत त्यांनी खुलासा, भाष्य अगर विश्लेषण याची मागणी केली आहे. (उदा. पा.नं.१७-ब- १,२,५) अशा प्रकारची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. मात्र

गाळे/सदनिका हस्तांतरणाच्या संदर्भात सद्यस्थिती नेमकी काय आहे, याची माहिती लेखी स्वरुपात अपीलकर्त्यास एका आठवड्यात द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.अग्निहोत्री यांनी दि.२९.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्याबाबतचा खुलासा आयोगाने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून मागविला. 'श्री.अग्निहोत्री यांनी मागितलेली माहिती पूर्वीच रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे, तसेच विषयांकित बाबत आपणास कळविण्यात येते की, माहिती अधिकार संदर्भात दि.१९.६.२००९ रोजीच्या सुनावणी दरम्यान माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे यांनी दिलेल्या सूचनांनुसार फुलेनगर येथील ३०० गाळे औद्योगिक कामगार वसाहतीचे संबंधित सहकारी गृहरचना संस्थेला अभिहस्तांतरण करण्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून जादा चटई क्षेत्राची रक्कम भरणा करण्याबाबत संस्थेला पत्र दिलेले आहे. सदरची रक्कम संस्थेने भरणा केल्यास ३०० गाळ्यांचे अभिहस्तांतरण सस्थेला करण्यात येईल, असे दि.२६.६.२००९ च्या पत्रान्वये श्री.अग्निहोत्री यांना रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आले आहे,' असे अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव, मंत्रालय श्री.सि.ठ.आधाव यांनी दि.४.९.२००९ च्या खुलाशानुसार संबंधित पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ, पुणे श्री.सा.गं.घोडे यांनी माहितीबाबतची पूर्तता केली आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. टी. सुब्रम्हण्यम्
रा. १४८/अ, रास्ता पेठ, दुसरा मजला, पुणे-११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३३, १९७३, २१५२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. टी. सुब्रम्हण्यम्
रा. १४८/अ, रास्ता पेठ, दुसरा मजला, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. शाम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

घर मालकांनी ओपन डक्टमध्ये बेकायदेशीर बांधकाम केल्यामुळे तळमजल्यावरील आपल्या वापरातील संडासाला कमी दाबाने पाणी येते, त्याबाबत वारंवार तक्रार करुनही दखल घेतली जात नाही. इमारतीतील मोकळ्या जागेत घर मालकाने संडास व बाथरुम बांधले होते. महानगरपालिकेने ते पाडल्यानंतर कोणत्या नियमानुसार पुन्हा परवानगी दिली, या सर्व स्थितीमुळे बांधकाम धोकादायक झाले असून कारवाई करणे आवश्यक असताना केली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. टी. सुब्रम्हण्यम यांनी केले. माहिती देण्याबाबत या विभागाकडून त्या विभागाकडे अशी टोलवाटोलवी केली जात असल्याची तक्रारही त्यांनी केली.

श्री.सुब्रम्हण्यम यांनी या विषयात वेळोवेळो तक्रार केली असून त्या त्या वेळी त्यांना उत्तर देण्यात आले आहे. तसेच त्यांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष पाहणी करुन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. बांधकामासाठी पुन्हा परवानगी मागण्याचा अधिकार असल्यामुळे ते मान्य केलेले आहे. विकास नियमावलीतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. श्याम ढवळे व अपिलीय प्राधिकारी श्री. मदन रामचंद्र आढारी यांनी केले.

विकास नियंत्रण नियमावली व धोकादायक बांधकामाबद्दलची नियमावली याची प्रत श्री. सुब्रम्हण्यम यांना त्वरित द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार श्री. सुब्रम्हण्यम यांना त्यांच्या सोईनुसार दि.१.९.२००८ रोजी आवश्यक त्या प्रती देण्यात आल्या, असा अहवाल आयोगाने विचारणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी श्री. श्याम ढवळे

यांनी दि.१८.९.२००९ रोजी आयोगाला सादर केला. विहित मुदतीत अहवाल सादर करण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शरदबापू रामचंद्र काकडे
२३१, चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर नं.१, पुणे-९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त
मुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त
उप मुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शरदबापू रामचंद्र काकडे
२३१, चित्ररेखा सोसायटी, सहकारनगर नं.१, पुणे-९

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त
मुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विरेंद्र जाधवराव

**जन माहिती अधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त
उप मुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती उल्का कळसकर

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

कोथरूड सर्व्हे नं. १४३/१, १४३/२, १४४/१+२, १४३/३,१४४/३ या जागेच्या टीडीआर पोटी १२ टक्के , ५ टक्के प्रमाणे पुणे महानगरपालिकेने एकूण किती रक्कम भरून घेतली आहे, त्यास मान्यता देणारे अधिकारी कोण आहेत, त्यांची नावे व पदनाम व चलनाची प्रत, तसेच सदर जागेबाबत गुन्हा नं.५७९/२००५ मध्ये पोलीसांनी मागणी केल्याप्रमाणे रक्कम पोलीसांकडे जमा केली आहे त्याबाबत माहिती तसेच इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

कोथरूड (पुणे) येथील टीडीआर च्या संदर्भात पाच मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ खाली नाकारली. संबंधित प्रकरणी कागदपत्रे पोलीस खात्याच्या भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाकडे दाखल केलेली असल्यामुळे माहिती देण्याबाबत त्यांचा अभिप्राय मागवावा, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त (मुख्य लेखापाल), पुणे महानगरपालिका, यांनी दिला. त्याविरूध्द श्री. शरदबापू रामचंद्र काकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तांत्रिक कारणे दाखवून तत्कालीन मुख्य लेखापाल श्री. अमरीश गालिंदे यांनी आपल्याला माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले, याच विषयात चार अर्ज केले होते, त्यातील दोन अर्जांचे उत्तर मिळाले व दोन अर्जांवर माहिती दिली गेली नाही, असे श्री. काकडे यांनी नमूद केले. संबंधित टीडीआर प्रकरणी पोलीस चौकशी चालू असल्यामुळे त्यावेळी माहिती नाकारण्यात आली. ही कागदपत्रे उपलब्ध करून घेऊन तयार असलेल्या ऊर्वरित माहितीसह अपीलकर्त्यास देण्यात येतील, असे निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले. त्यानुसार श्री. काकडे यांना सर्व माहिती द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार दि. २३.९.२००८ च्या पत्रान्वये तत्त्कालीन मुख्य लेखापालांनी श्री. काकडे यांना माहिती दिली आहे, असा अहवाल आयोगाने विचारणा केल्यानंतर विद्यमान मुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, यांनी दि. ११.९.२००९ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंद दत्तात्रय राजवाडे
८०४/अ, भांडारकर रोड, पुणे-

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००८ |

३. **उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामचंद्र तुकाराम शेळकंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.४.२००८ |

८ **<u>मुळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**
सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. आनंद दत्तात्रय राजवाडे उपस्थित नसल्यामुळे दि. १२.८.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण दुर्धर विकाराने ग्रस्त असून 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स व सुनावणीला उपस्थित राहू शकत नाही, असे श्री. राजवाडे यांनी कळविले.

आपण मागितलेली माहिती जनहितार्थ असूनही दिली जात नाही, अशी तक्रार श्री. राजवाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

भांडारकर रोडवरील दुकानांबाबत त्यांनी तपशील दिलेला नसल्यामुळे निश्चित स्वरुपात सर्व माहिती देता आली नव्हती, हे खात्यातील अधिकाऱ्यांचे निवेदन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले व अभिलेख विभागाकडून संबंधित माहिती उपलब्ध करुन घेऊन श्री. राजवाडे यांच्याशी संपर्क साधून द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी दिला होता. त्यानुसार त्यांना माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, पुणे महानगरपालिका श्री. रामचंद्र तुकाराम शेळकंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे लेखी निवेदन श्री. राजवाडे यांनी आयोगाला सादर केले. तसेच संबंधित प्रकरण यापुढे चालू ठेवण्यात आपल्याला स्वारस्य नाही, असेही त्यांनी लेखी निवेदनाद्वारे आयोगाला कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

पुणे
दि. ३० .०९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय विठ्ठल गवारे
मु. पो. भोरी गॅस गोडाऊन समोर, पाटस रोड,
पतंगशाहनगर, बारामती, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बारामती,
ता. बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी (होळकर)
ग्रामपंचायत तांदुळवाडी, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.४.२००९ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** - श्री. विजय विठ्ठल गवारे
मु. पो. भोरी गॅस गोडाऊन समोर, पाटस रोड,
पतंगशाहनगर, बारामती, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी (होळकर)
ग्रामपंचायत तांदुळवाडी, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.३.२००८ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती
सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

फेरफार नोंद करताना तलाठ्यांनी संबंधितांना नोटिसा न काढता कार्यवाही केली. त्याबाबतची माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विजय विठ्ठल गवारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

अपीलकर्ता श्री. गवारे हे संबंधित जमिनीच्या लगतच्या गटाचेही खातेदार नाहीत, तरीही आपल्याला नोटीस दिली नाही, अशी त्यांची तक्रार आहे. मूळ संचिकेनुसार सर्व माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मूळ संचिकेसह केले. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन निकाली काढण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जनमाहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१६/ सातारा | श्री. भगवान विष्णू वाघमारे अमरदिप रेल्वे को-ऑप. हौसिंग सोसायटी, ३२, चेतना स्कूलच्या पुढे, हाजी मलंग रोड, कल्याण (पूर्व), जि.ठाणे | वतन संकलन विभाग, अभिलेख कक्ष, तहसीलदार कार्यालय कोरेगांव, जि.सातारा | तहसीलदार कोरेगांव, ता.कोरेगांव, जि.सातारा | दिनांक १८.८.१९७५ रोजी क्र. वतन/एसआर /५६० अन्वये तहसीलदार, कोरेगाव यांच्या हुकुमाची व त्या लगत झालेल्या सर्व वतन प्रोसिडिंगच्या सर्टिफाईड नक्कला | १)अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत अपीलकर्त्यास राज्य माहिती आयोगाच्या दिनांक २१.८.२००७ च्या पत्रान्वये कळवून देखील अपीलकर्त्याने आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. |
| २ | ५६९ / सातारा | श्रीमती कलावती रघुनाथ खरात २२/१५५१, अभ्युदय नगर, मुंबई-३३ | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा | निवासी उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा | महाराणी सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), लोणंद च्या भूखंड वाटपातील गैरव्यवहाराच्या चौकशी संदर्भात ७ मुद्दयांमध्ये माहिती | अपीलकर्त्याने मागणी केल्यानुसार मुद्देनिहाय माहिती पुन्हा देण्याचे ठरल्याने अपील निकाली काढण्याबाबत उभय घटकांमध्ये एकमत झाले असून त्यानुसार दिनांक ५.२.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५८०/ सातारा | श्री. उमेश श्रीनिवास भिसे विश्वस्त, श्री विठोबा देव खटाव, ता.खटाव, जि.सातारा | उप विभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, ता.फलटण, जि.सातारा | अपर जिल्हाधिकारी, सातारा, जि.सातारा | अपीलकर्त्याने श्री विठोबा देवस्थान, मौजे हुसेनपूर, ता.खटाव, जि.सातारा येथील ग.नं. ५२३, ५२८ व ५२९ या जमीनीचे ७/१२ मध्ये रहिवास सदरी विश्वस्तांचे नावाची नोंद होणेबाबत केलेल्या विनंती अर्जासंदर्भात महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविलेला अहवाल तसेच पुराव्यादाखल जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती. | माहिती मुदतीत मिळाली असल्याने कोणतीही तक्रार राहिली नसल्याने अपील निकाली काढण्याबाबत उभय घटकांत एकमत झाल्याचे त्यांनी दिनांक ५.२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात एकमताने नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

(१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र.२१६/सातारा, ५६९/सातारा, व ५८०/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०-०९-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अरविंद यादवराव अभंग
मु.पो. नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जुन्नर, ता. जुन्नर
जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जुन्नर
ता. जुन्नर, जि. पुणे — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.४.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अरविंद यादवराव अभंग
मु.पो. नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जुन्नर
ता. जुन्नर, जि. पुणे श्री. विजय पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.४.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

रस्ता केस क्र. १७/ २००६ चे केस कामकाजात दि. २६.११.२००७ रोजी अध्यासी अधिकारी यांनी जाब देणार यांचे खर्चाने नोटीस काढण्यासाठी केलेल्या चलनाची प्रत

**विवेचन**

रस्ता विषयक दाव्यात 'जाब देणार यांचे खर्चाने नोटीस काढावी,' असा आदेश तहसीलदार, जुन्नर यांनी दिला होता. जाबदाराने भरलेल्या चलनाची प्रत आपण मागितली होती, ती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अरविंद यादवराव अभंग यांनी केली होती.

जाब देणाऱ्याच्या खर्चाने नोटीस काढा असे म्हटले होते, परंतु अर्जदार समक्ष हजर झाल्याने, नोटीस समक्ष देण्यात आली. चलनाने पैसे भरुन घेतले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जुन्नर यांनी नमूद केले. मुळातच नसलेली माहिती अपीलकर्ता मागत आहेत. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. हरिश्चंद्र पुंडलिक बाराते
फ्लॅट नं.७, श्री.शुभकम्मा सो.
सिटीएस नं.५२५, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य प्रमुख,
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. हरिश्चंद्र पुंडलिक बाराते
फ्लॅट नं.७, श्री.शुभकम्मा सो.
सिटीएस नं.५२५, येरवडा, पुणे-६

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. मुकुंद भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोसायटीच्या पार्कींगमध्ये साचलेल्या पाण्याची विल्हेवाट करण्याबाबतची माहिती

## विवेचन

आपण राहत असलेल्या गृहनिर्माण संस्थेच्या तळघरात / पार्कींगमध्ये साचणारे पाणी व निचऱ्याची व्यवस्था याबाबतची माहिती आपल्याला अद्यापपर्यंत दिली जात नाही. महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी न करता भोगवटा पत्राबाबतचा अहवाल दिला आहे, त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. हरिश्चंद्र पुंडलिक बाराथे यांनी केली.

विहित मुदतीत उत्तर पाठविण्यात आले होते. तसेच प्रथम अपील केलेले नाही. अपीलकर्त्याने कागदपत्रांची किंवा अन्य माहितीची मागणी केली नसून तळघरातील पाण्याच्या संदर्भात कारवाई करण्याची मागणी आहे. खाजगी हद्दीतील हा विषय असून विकसक व गृहनिर्माण संस्था यांनी एकत्रितपणे प्रश्न सोडविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, पुणे महानगरपालिका श्री. मुकुंद भोसले यांनी केले. तळघर जमिनीच्या पातळीच्या खाली आहे, त्याची भिंत वॉटरप्रूफ नसल्याने पाणी साचत आहे, ड्रेनेज लाईनला ते जोडता येणार नाही. गळतीने पाणी तळघरात साचत असल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांसमवेत केलेल्या प्रत्यक्ष पाहणीनंतर त्यात गप्पी मासे सोडले. इमारतीचा अनधिकृत वापर सुरु आहे, असेही प्रतिपादन श्री. भोसले यांनी केले.

अपीलकर्त्याला प्रशासकीय कार्यवाही अपेक्षित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**

**दि. २४ .९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि. २३.१२.२००८ रोजी पुणे येथे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | ॲड.विकास व्ही.जोशी<br>रा.साई सदन, प्लॉट नं.२९,<br>४ था मजला, पुण्याईनगर,<br>धनकवडी, पुणे ४११ ०४३ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | चिटणीस,<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे- ४११ ००१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपायुक्त (महसूल),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे-४११ ००१ | हजर |
| ५ | मूळ अर्जातील मागणी | विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात दि.०८.०९.१९९८ रोजीच्या पार पडलेल्या The Airfield Enviornmental Management Committee Meeting बाबतच्या सर्व कागदपत्रांची मागणी | |

## विवेचन

सदरहू माहितीचा अर्ज व प्रथम अपील अनुक्रमे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे कक्षेतील विषय नसतानाही त्यावर कार्यवाही करणे / सुनावणी घेऊन संबंधित शाखेकडे संपर्क साधण्याचे कळविणे ऐवजी विभागीय आयुक्त कार्यालयातील संबंधीत (सर्वसाधारण शाखा) कार्यासनाकडे माहितीचा अर्ज व प्रथम अपिल, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) नुसार वर्ग करणे व त्यानुसार अर्जदारास अवगत करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही न

केल्यामुळे अर्जदार अद्यापपर्यंत आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहिला आहे. यास्तव, आपल्याशी निगडीत नसताना माहितीचा अर्ज व प्रथम अपील आपणाकडे ठेवणे ही कृती माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदींशी विसंगत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) आपल्या कार्यालयाशी संबंधीत नसलेल्या प्राप्त माहिती अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) अन्वये आवश्यक ती कार्यवाही न केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस श्री.अरुण कुरुलकर व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (महसूल), श्री.एस.डी. राजेनिंबाळकर यांना समज देण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. : ०४.०९.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोरेश्वर विश्वनाथ भिडे
१०८, रामाचा गोट, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४ /सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१ . ८ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोरेश्वर विश्वनाथ भिडे
१०८, रामाचा गोट, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.स.या.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा श्री.मो.स.काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.७.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१७६-अ रामाचा गोट, सातारा मधील दि.२७.११.१९८९ रोजी केलेल्या क्षेत्र दुरुस्तीचा तपशील व क्षेत्र कमी करण्याचे कारण, त्याविषयी असलेल्या आदेशाची स्थळ प्रत. |
|---|---|

## विवेचन

दि.२७.११.२९८९ च्या फेरफार नोंदीत आपले क्षेत्र कमी केल्याचा क्षेत्र दुरुस्ती आदेश व संबंधित तपशील मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.मोरेश्वर विश्वनाथ भिडे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा याच्याकडे केली होती. क्षेत्र दुरुस्तीचा आदेश अभिलेखात आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा यांच्याकडे केलेल्या अपिलात अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार आठ दिवसात आपल्याला माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री.भिडे म्हणतात त्याप्रमाणे आदेश अभिलेखात आढळत नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री.मो.स.काळे व अपिलीय प्राधिकारी श्री.स.या.भोसले यांनी प्रपत्रात नमूद केले व त्याचाच पुनरुच्चार आयोगापुढील सुनावणीत केला. श्री.भिडे यांची मूळ तक्रार क्षेत्र दुरुस्तीबाबत असून दि.१६.११.१९८९ च्या मूळ अर्जावर त्यांनी दि.२६.९.२००७ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा यांच्याकडे स्वतंत्ररीत्या अपील केले आहे. फेरचौकशीसाठी हे प्रकरण नगर भूमापन अधिकारी, सातारा यांच्याकडे दि.११.८.२००८ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा यांच्या आदेशानुसार पाठविण्यात आले आहे. त्या निर्णयानुसार प्रत्यक्ष जागेवर मोजणी होऊन मूळ

अभिलेखानुसार क्षेत्राची खात्री होणार आहे व त्याबाबत नियमानुसार कळविले जाणार आहे, असे श्री.काळे व श्री.भोसले यांनी प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन मोजणी करुन त्याप्रमाणे शक्यतो लौकर क्षेत्र दुरुस्ती करुन त्याप्रमाणे नकाशे व उतारे मिळावेत, अशी मागणी श्री.भिडे यांनी प्रपत्रात नोंदविली. पुनर्मोजणी करुन नियमानुसार पुढील कारवाई करण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले असल्यामुळे हा पर्याय आपल्याला मान्य असल्याचे श्री.भिडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

संबंधित अभिलेख सन १९९३ मधील आहे. अभिलेखाच्या वर्गवारीनुसार त्याचे जतन झाले नसल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र अभिलेख कायदा २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा. क्षेत्र दुरुस्तीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा पूर्तता अहवाल १५ दिवसांत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. यानुसार कार्यवाही न झाल्याची तक्रार श्री.भिडे यांनी दि.१९.९.२००८ रोजी आयोगाकडे लेखी स्वरुपात व त्यानंतर मौखिक स्वरुपात केली. या अनुषंगाने आयोगाने केलेल्या विचारणेनुसार नगर भूमापन अधिकारी, सातारा श्री.मो.स.काळे यांनी दि.७.११.२००८ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.स.या.भोसले यांन दि.२७.८.२००९ रोजी सविस्तर अहवाल आयोगाला सादर केला. श्री.भिडे यांनी दि.२६.९.२००७ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा यांच्याकडे केलेल्या अपिलात दिलेल्या आदेशानुसार दि.१०.९.२००८ ला मोजणी करण्यात आली. दि.१६.१०.२००८ ला त्याचा आदेश पारित करण्यात आला, असे श्री.काळे यांनी अहवालात नमूद केले आहे. याबाबतचा संपूर्ण तपशील अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.स.या.भोसले यांनी दि.२७.८.२००९ च्या अहवालात नमूद केला असून मूळची नोंद योग्य असल्याचे म्हटले आहे. तसेच याबाबत श्री.भिडे यांनी सिव्हिल जज्ज सिनियर डिव्हिजन, सातारा यांच्या न्यायालयात दावा दाखल केला असून तेथेही या स्वरुपाचा अहवाल नगर भूमापन अधिकारी, सातारा यांनी सादर केला असल्याचे श्री.स.या.भोसले यांनी म्हटले आहे. अभिलेखाच्या जतनाबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील अहवालात नमूद केला असून मूळ क्षेत्र दुरुस्तीच्या काळातील कार्यवाहीच्या पध्दतीनुसार दुरुस्ती झाल्याचे दिसून येते, त्यामुळे क्षेत्र दुरुस्तीचा लिखित

आदेश काढला असण्याची शक्यता नाही असे त्यांनी स्पष्ट केले आहे. श्री.स.या.भोसले यांनी केलेली ही कार्यवाही योग्य असून संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्याची आवश्यकता नाही.

क्षेत्र दुरुस्तीच्या अनुषंगाने माहितीच्या अधिकारांतर्गत व पुनर्मोजणी आदि प्रशासकीय बाबींची कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूर्ण केली आहे. क्षेत्र दुरुस्ती करुन त्यानुसार नोंद होऊन उतारे मिळणे ही अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७ .९.२००९**